महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

Lokneta News - लोकनेता न्यूज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

सोमवार दि.११ मे २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ अंक : २६४ | किंमत २ रुपये | 7499615933



प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933


# शुभेच्छांच्या वर्षावाने जबाबदारी ओझे अधिक वाटले



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

दैनिक लोकनेताच्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरातून, विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून, वाचकांकडून, जाहिरातदारांकडून, सामाजिक कार्यकर्त्यांकडून तसेच पत्रकार बांधवांकडून शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव होत आहे. या प्रेमाने आणि विश्वासाने आमचा उत्साह निश्चितच वाढला असला, तरी त्याचबरोबर जबाबदारीचे ओझेही अधिक वाढल्याची भावना आज मनामध्ये दाटून येत आहे.

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात एखादे वृत्तपत्र सुरू करणे जितके सोपे वाटते, तितकेच ते टिकवणे कठीण असते. सत्य, निष्पक्षता आणि समाजहित या मूल्यांना जपत पत्रकारिता करणे हे मोठे आव्हान असते. अशा परिस्थितीत दैनिक लोकनेताने गेल्या तीन वर्षांत जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे आणि समाजातील सकारात्मक घडामोडींना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम सातत्याने केले आहे. लोकनेता हे केवळ एक वृत्तपत्र नाही, तर सामान्य माणसाच्या भावना, वेदना, प्रश्न आणि आशा यांचे प्रतिबिंब बनले आहे. ग्रामीण भागातील समस्या असोत, शेतकऱ्यांचे प्रश्न असोत, युवकांच्या रोजगाराचा विषय असो किंवा सामाजिक क्षेत्रातील उपक्रम – प्रत्येक विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न लोकनेताने केला आहे. त्यामुळेच अल्पावधीत लोकनेताने वाचकांच्या मनात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले.

वर्धापन दिनानिमित्त मिळणाऱ्या शुभेच्छा हा आमच्यासाठी केवळ आनंदाचा विषय नाही, तर तो जनतेने आमच्यावर ठेवलेल्या विश्वासाचा पुरावा आहे. प्रत्येक शुभेच्छा आम्हाला अधिक प्रामाणिकपणे काम करण्याची प्रेरणा देत आहे. लोकांसाठी, लोकांच्या प्रश्नांसाठी आणि लोकहितासाठी ही भूमिका अधिक सक्षमपणे पार पाडण्याची जबाबदारी आता आमच्या खांद्यावर अधिक मोठ्या प्रमाणात आली आहे.पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. त्यामुळे समाजात घडणाऱ्या प्रत्येक घटनेवर सजग नजरेने लक्ष ठेवणे, सत्य बाहेर आणणे आणि जनतेसमोर वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवणे हे आमचे कर्तव्य आहे. या कर्तव्याची जाणीव ठेवून दैनिक लोकनेता पुढील काळातही निर्भीड, निःपक्ष आणि समाजाभिमुख पत्रकारितेचा मार्ग अधिक ताकदीने चालत राहील.

या प्रवासात आमचे मार्गदर्शक, जाहिरातदार, हितचिंतक, वाचक आणि पत्रकार बांधव यांनी दिलेले सहकार्य हे आमच्यासाठी अमूल्य आहे. त्यांच्या विश्वासामुळेच लोकनेताचा प्रवास अधिक बळकट होत आहे.वर्धापन दिनाच्या या निमित्ताने आम्ही पुन्हा एकदा समाजाप्रती बांधिलकी व्यक्त करत आहोत. मिळालेल्या प्रेमाचा आणि शुभेच्छांचा मान राखत, अधिक जबाबदारीने आणि अधिक ताकदीने लोकहिताची पत्रकारिता करण्याचा निर्धार दैनिक लोकनेता परिवार करत आहे.

**–ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे**
**मुख्य संपादक दैनिक लोकनेता**

# किनवट! माहूर तालुक्याचे पिक विम्याची उर्वरित रक्कम त्वरित अदा करा–मा.श्री.सचिनभाऊ नाईक

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**किनवट । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील किनवट माहूर मंडळनिहाय शिल्लक राहिलेल्या स.न. २०२५ मधील खरीप हंगामातील पिक विम्याची रक्कम त्वरित अदा करावी या मागणीचे निवेदन मा. श्री. सचिन भाऊ नाईक यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे दिले आहे

हंगामातील पिक विमा योजनेअंतर्गत अनेक शेतकऱ्यांना मिळणारी भरपाई अद्याप प्रलंबित मा.सचिनभाऊ नाईक यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, जिल्ह्यातील सन २०२५ मधील खरीप असल्याचे निदर्शनास आले आहे. विविध मंडळांमध्ये पिक विम्याच्या रकमेचे वितरण अपूर्ण राहिल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

सदर प्रकरणाची शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आपण या विषयावर तातडीने दखल घेऊन मंडळनिहाय शिल्लक राहिलेल्या खरीप हंगामातील पिक विम्याची रक्कम त्वरित अदा करण्यात यावी. तसेच संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देऊन ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी, अशीही मागणी मा.श्री.सचिन नाईक यांनी केली आहे...



# ‘भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेत’ पुणे येथील जीएसटी संघाने मारली बाजी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन आणि युवा नेते अक्षय भैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून केज येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा समारोप अत्यंत उत्साहात पार पडला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या संघांनी आपल्या अष्टपैलू खेळाने प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.अंतिम सामन्यात पुणे येथील जीएसटी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर आपले नाव **कोरले.**स्पर्धेमध्ये विजेत्या ठरलेल्या संघांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. स्पर्धेचा अंतिम निकाल खालीलप्रमाणे राहिला.

प्रथम पारितोषिक विजेता पुणे जीएसटी टीम,द्वितीय पारितोषिक अमन संघ,बीड,तृतीय पारितोषिक अमन बी संघ,बीड,चतुर्थ पारितोषिक किनवट संघ नांदेड,

केवळ सांघिकच नव्हे, तर वैयक्तिक कौशल्यात ही खेळाडूंनी चमक दाखवली.स्पर्धेतील मानकरी ठरलेले खेळाडू मॅन ऑफ द मॅच– हर्ष चौधरी,बेस्ट स्मॅशर– वाजिद सय्यद,बेस्ट सर्व्हिस– शोएब सय्यद, बेस्ट लिब्रो– पांड्या

बक्षीस वितरण संपन्न झाले.समारंभाला रणजीत सिंह पाटील, पीएसआय फारुख कादरी,कबीर इनामदार, अकबर इनामदार, प्रकाश मुंडे पत्रकार, विनोद गुंड सर,रमजान भाई,एत्तेशाम कादरी आणि वसीम शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गप्पेवाडीत मृत्यूचा सापळा! जमिनीला टेकलेल्या वीजतारांमुळे ग्रामस्थांचा जीव धोक्यात ; महावितरणचा बेजबाबदारपणा टोकाला

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील गप्पेवाडीयेथील बाराभाई वस्ती ते महादेव वस्ती दरम्यान महावितरणचा भोंगळ कारभार समोर आला आहे.येथील उच्च दाबाच्या (३–फेज) वीज तारा अक्षरशः जमिनी लगत लोंबकळत असून, कधीही मोठी जीवित हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही विडा उपकेंद्रातील अधिकारी याकडे डोळेझाक करत असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

**नेमकी परिस्थिती काय?**

गप्पेवाडीतील या मुख्य मार्गावर बाराभाई वस्ती पासून महादेव वस्तीपर्यंत विजेच्या तारा अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत.या तारा इतक्या खाली आल्या आहेत की, रस्त्यावरून चालणाऱ्या नागरिकांच्या डोक्याला त्या कधीही स्पर्श करू शकतात.या परिसरात अहोरात्र वर्दळ आहे.याच मार्गावरून लहान मुले, शाळकरी विद्यार्थी आणि शेतकरी आपल्या जनावरांसह ये–जा करतात.तसेचभाविकांचा राबता जवळच मंदिर असल्याने महिला आणि वयोवृद्धांची येथे मोठी गर्दी असते.पावसाळा तोंडावर असल्याने जमीन ओलसर होऊन विजेचा प्रवाह जमिनीत उतरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**प्रशासनाची गाढ झोप आणि ग्रामस्थांचा संताप**

मिळालेल्या माहिती नुसार,ग्रामस्थांनी या गंभीर समस्येबाबत विडा उपकेंद्र येथील महा वितरण कार्यालयात अनेकवेळा लेखी व तोंडी तक्रारी केल्या आहेत. मात्र,ढिम्म प्रशासनाने अद्याप याकडे ढुंकूनही पाहिलेले नाही.एखाद्या निष्पाप जीवाचा बळी गेल्यावरच प्रशासनाला जाग येणार काय?असा संतप्त सवाल गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे.आम्ही रोज जीव मुठीत धरून येथून प्रवास करतो.महावितरण च्या अधिकाऱ्यांना अनेकदा सांगितले,पण ते याकडे दुर्लक्ष करत आहेत.जर उद्या एखादी दुर्घटना घडली,तर त्याला जबाबदार कोण?असा सवाल संतप्त ग्रामस्थ विचारत आहेत.

**आंदोलनाचा इशारा**

महावितरणच्या या जीवघेण्या निष्काळजी पणामुळे गप्पेवाडीकर आता आक्रमक झाले आहेत.जर येत्या दोन – तीन दिवसांत या वीज तारांची दुरुस्ती करून त्या उंच करण्यात आल्या नाहीत, तर विडा उपकेंद्रा वर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीला महावितरण प्रशासनच सर्वस्वी जबाबदार असेल,असेही गावकऱ्यांनी स्पष्ट केले आहे.आता तरी महा वितरणचे वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाची दखल घेऊन मृत्यूचा हा सापळा हटवणार की पुन्हा एखाद्या दुर्घटनेची वाट पाहणार,हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



# संपादकीय

## वेदनेचा हुंकार

अंधारल्या दिशांना दुःखाची सल सलीला घायाळ जखमांचे भय भयाला भयावह अनामिक चिंता चिंतेच्या जोडीला चितेची वाट वाटेशी दटावत वृत्तींचा घाट घाटावर ऐकवत नाही चित्कार देहाला सोसवत नाही वार अंगाखांद्यावर स्पर्शाचा भार ऐ माय मी मरते वारंवार.

लहान–मोठ्या मुली ते विधवा, परित्यक्ता, वयोवृद्ध महिलांवर वैमनस्यातून होणारे अन्याय, अत्याचार, घरंदाज विवाहितांचे संशयास्पद मृत्यू, आत्महत्या प्रकरण म्हणजे समस्त स्त्री वर्गाची शारीरिक, मानसिक चाळण करण्याचे दरमहा वाढीस लागलेले प्रकार. या छिन्नविछिन्न करणाऱ्या मरणासन्न अवस्थेतून जाणं यासारखी क्लेषकारक घटना नाही. आजची उद्विग्न परिस्थिती ही याचं उत्तम द्योतक आहे. ढासळलेली व्यवस्था, बंदिस्त चौकट, राजकारणातले कैक डावपेच, न्यायप्रतीक्षेच्या विलंबित सहयोगामुळे विदारक स्थिती निर्माण झाली आहे, जी स्त्री–पुरुष समानता निवाड्याच्या संदर्भात उलटी खेळी खेळते. आचार–विचारांच्या सदाचारी मूल्यांना पायदळी तुडवण्याचे प्रकार वारंवार घडतात. जेव्हा यंत्रणा चौकटी बाहेरचा न्याय देऊ शकत नाही, तेव्हा समाजाभिमुख मानसिक संतुलनाचा विषय मुख्य ठरतो. आजच्या घडीला मानसिक स्वास्थ्याकडे गांभीर्याने पाहण्याची, तिची मशागत करण्याची गरज आहे.एकविसाव्या शतकात आपण स्त्री–पुरुष समानतेचे गोडवे गातो. ते गाताना आपण थकत नाही. स्त्री म्हणजे माता, भगिनी ते देवस्वरूप भवानी आई. नारायणी रूपात आपण तिची पूजा बांधतो. कवन रचतो, गुणगान गातो. पण एका मोहाच्या क्षणी अमानवी अजगरी पाशात तिला अडकवलं जातं. वाममार्गे गुंगीच्या औषधांचा उतारा दिला जातो. राक्षसी वृत्तीचे व्रण शरीरभर उमटताना गुप्तांगावर वार करत अश्लील व्हिडीओ समाजमाध्यमात पसरवण्याची धमकी दिली जाते. शेवटी बलात्कार करून, खून करून तिची विल्हेवाट लावली जाते. ओळख मिटवली जाते. हा बदल एका दिवसातला नसतो, तर पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलेलं असतं तेव्हा तो जाणवू लागतो. शरमेने मान खाली घालायला लावणाऱ्या विटंबना भयंकर कृत्याच्या मालिका षंढ समाजात रुजत आहेत. समाजात जेव्हा काही वेगळं घडतं तेव्हा त्याची सुरुवात चार भिंतीतल्या कुटुंबाच्या आत होत असते. लैंगिक शोषण असो वा अनैतिकता, व्यभिचार वा विवाहबाह्य संबंध असो नराधमाला पाठीशी घालणारी घरची देखील यात सामील असू शकतात. यास्तव बाईकडे पाहण्याचा दृष्टिकोनहीन आणि समस्त स्त्रीवर्गाला अधाशी वासनांध नजरेतून पाहण्याची जणू मुभा प्राप्त झाली असावी असा झाला आहे. संशय निर्माण करणाऱ्या नात्यातली तेढ वाढत जाऊन अनैतिक संबंध, पुनर्विवाह, पती–पत्नी, प्रियकर–प्रेयसी त्रिकोण, कुणाचा पायपोस कुणाला नसल्याने कुणीही यावे टपली मारून जावे, बघू नये, बोलू नये, गुपचूप बसावे अशा प्रकारच्या कर्मकांडाला आपणचं खतपाणी घालत आहोत.कुस्करली कोवळी काया दाह भरले भेदरले अंग देहाचे भग्न अवशेष मुग्धकलिका छिन्नविछिन्न दल नाजूक भावकळ्यांचे पाऊले चिमुकली सानुली कळी खुलण्याआधी परतली न मागे फिरली, परतली न मागे फिरली.नसरापूर घटनेतील छोट्या चिमुकलीवर शब्दांत भावना व्यक्त करणं कठीण आहे. जो अत्याचार झाला त्याची जखम खोलवर आहे. आतून काही तुटल्यासारखं होताना वेदनेचा आवाज गपगार झाला आहे. आज पाशवी अत्याचार करणारे विकृत नराधम आणि उर्वरित व्यवस्था बाईचा आवाज दडपून टाकतील, पण उद्या हाच आवाज प्रतिरोधाच्या आगीत तुम्हाला भस्म करेल. आजची स्त्री सुरक्षित आहे का? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. सर्वांच्या नजरा त्याकडे लागून राहिल्या आहेत. माणूस माणसापासून दूर जात आहे. सहनशक्तीचा कडेलोट होतोय. प्रश्नमंजूषा पेटून उठली आहे. या सगळ्याला जबाबदार कोण? मानसिक विकृती की भाग्यशाली संस्कृती याची जाणीवपूर्वक विचार करून उत्तरं देण्याची वेळ आली आहे. फाशी देऊन, बंदुकीच्या गोळ्या घालून, रस्त्यात जमावाकडे सुपूर्द करून, कडेलोट, जन्मठेप देऊन नराधम माणूस मरेल, पण शिक्षा इतकी भयंकर हवी की ही नालायक 'वृत्तीचं' मरायला हवी. माजलेल्या भेकड वाकडतोंड्या नराधमाला आलेली हिम्मत मारायला हवी. याला फाशी देणं म्हणजे याची क्षणात सुटका करणे, असे न करता याच्याच मार्गांवर असणाऱ्यांना हादरवून सोडणारा भयंकर मृत्यू याला द्यायला हवा. अखेर मृत्यू म्हणजे सुटका वाटायला हवी.मर्यादा ओलांडणाऱ्या महिन्याभरातल्या घटना पाहता हे जग आपल्यासाठी नाही याची खात्री पटत चालली आहे. मानवी मनातली गुंतागुंत पाहता माणसं विरुद्ध वाढत चाललेल्या विकार विकृतीची नशा जोर धरू लागली आहे. अशा क्रूर निर्दयी मानसिकतेला बदलणं अशक्यप्राय गोष्ट आहे. कारण जगात माणूसपण संपत चाललंय तसा चांगुलपणा पानावरील मिठासारखा केवळ नावालाचं उरलाय. पुढच्या काळात बाईच्या जातीला काय काय वाढून ठेवलं असेल सांगता यायचं नाही. स्पर्श न कळण्याइतपत ती बधिर नाही पण अव्यक्त जळजळीत नजरेचा स्पर्श किती खोल रुततो हे तीच तिचं जाणो. लहानपणापासूनच्या अनेक स्पर्शात वासना, कित्येक चाळे कशावरून तिने अनुभवले नसतील? ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. जागोजागी अंगाखांद्यावर रुळलेले, रस्तोरस्ती, घरादारांत, शाळा, कॉलेजमध्ये अनामिक चाटून गेलेल्या कितीतरी स्पर्शांची कथा विचार करायला लावणारी आहे. यावर खबरदारीचा उपाय म्हणून स्वतःच्या आणि मुलीच्या सुरक्षिततेची उपाययोजना हवी. काळ सोकावला असता मुलींच्या जन्मामागे पुरुष वर्ग विचाराधीन होईल. काळजी करेल. आई–बापाच्या पोटी कन्या युक्त भीतीच्या भिंती उभ्या राहतील. हीच भीती मनात घेऊन मुली जन्म घेतील. बाप आणि आजोबा सोडला तर कुठेही कुणाबरोबर जाण्याची भीती कन्या बाळगतील. न्यायप्रवीष्ट व्यक्त होण्याचे सारे मार्ग बंद होतील. एव्हाना व्यक्ततेत बदल झाला असता, तर सगळं चित्र पालटलं असतं. पण असं होत नाही, उलट आवाज दडपवण्याच्या प्रयत्नात नराधम रातोरात सुटल्याचे आपण पाहतोय. त्यांचाच जय होतोय. अशा घटनेतून पृथ्वीचा विनाश काळ जवळ येण्याचे संकेत खऱ्या अर्थाने मिळू लागले आहेत. खून, मारामाऱ्या, दरोडे, लुटमार, बलात्कार, अब्रूचे धिंडवडे, व्यभिचार, भ्रष्टाचार या साऱ्यांनी डोकं वर काढलं आहे. अत्र तत्र सर्वत्र अराजकतेचं राज्य पसरलंय. मोर्चे, आंदोलन, नैसर्गिक हानी, जाळपोळ, आगीच्या घटना या सगळ्या हानिकारक गोष्टी मानवाला, चराचराला संपुष्टात आणतील. मरण दाराशी येऊन थांबलंय तसे आपण डोक्यावर जास्तीचा भार घेऊन जगतोय. यामध्ये 'विनाशकाले विपरीत बुद्धी'चा परिणाम भयंकर असेल. यात आपल्या कित्येक पिढ्या जळून खाक होतील. तेव्हा आता खरी गरज आहे शांततेची, मग्नतेची, स्वतःमध्ये डोकावण्याची. जग बदलायच्या प्रयत्नात आपण बिघडत चाललो आहोत. सुधारणा करून चांगलं वागण्याचा प्रयत्न तरी करून पाहूया. आत असलेला काळाकुट्ट अंधार नाहीसा करू या. मनातल्या जळमटीला तिलांजली वाहू या. अति रागलोभाचे निरसन करू या. हिंसक विचार प्रयत्नपूर्वक सोडू या. स्वतःपासून केलेली सुरुवात हीच खरी सुरुवात असेल. नांदी असेल. जोवर पृथ्वी आहे तोवर जग आहे. जगावेगळी सृष्टी स्थावर आहे. तेव्हा हे सुंदर जग सानुल्या चिमुकल्या जीवांसाठी विश्वासार्ह जगण्यालायक आणि आनंदी राहण्यायोग्य बनवण्याच्या प्रयत्नात माणूस म्हणून जगताना या साऱ्या गोष्टींचं भान ठेवू या.

# नसरापूर घटनेचा रावेरमध्ये तीव्र निषेध; तहसीलदार यांना निवेदन देऊन फास्ट ट्रॅक कोर्टाची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जळगाव । जितु इंगळे**



पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे घडलेल्या अमानुष आणि संतापजनक घटनेचे पडसाद आता संपूर्ण राज्यात उमटत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ रावेर (जि. जळगाव) येथील विविध सामाजिक संघटना आणि संतप्त नागरिकांनी एकत्र येत रावेर तहसील कार्यालयावर धडक दिली व प्रशासनाला निवेदन सादर केले.

या निवेदनातून नागरिकांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या असून खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:या प्रकरणाचा खटला झजडउज अंतर्गत फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून दोषींना लवकरात लवकर कठोर शासन व्हावे.पीडित कुटुंबाला न्याय: तातडीने आणि संरक्षण मिळवून द्यावे.राज्यात वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी.

अशा अमानुष घटनांमुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरलेला नाही, हे यातून स्पष्ट होते. सरकारने कठोर पावले उचलून महिलांना सुरक्षित वातावरण द्यावे, असे मत आंदोलकांकडून व्यक्त करण्यात आले.

निवेदन देणारे मान्यवर या प्रसंगी शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते,

सौ. संगीता भास्कर महाजन ,सौ डॉ योगिता संदीप पाटील ,जयंत कुळकर्णी,पद्माकर महाजन,प्रकाश मुजुमदार, प्रल्हाद महाजन,सौ. सुवर्णा जे. भागवत रविंद्र पाटील, प्रकाश जोशी ,सौ. जयश्री अ. शिंदे यशवंत पाटील, योगीराज पाटील, दिलीप वैद्य, दिलीप कांबळे

डॉ. राजेंद्र पाटील, लखमसी पटेल किशोर पाटील, योगेश पाटील व ईतर मान्यवर उपस्थित होते .रावेरमधील या आंदोलनामुळे प्रशासनावर दबाव निर्माण झाला असून, आता शासन यावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सुनेत्रा पवार यांनी दिला राजीनामा;त्यांच्या रिक्त जागी भुजबळांच्या नावाची चर्चा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात महायुती मधील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार बारामती मतदारसंघातील पोटनिवडणूकीत निवडून आल्याने त्यांनी आज आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यांनी आज उपराष्ट्रपती तथा राज्यसभेचे सभापती सी पी राधाकृष्णन यांची भेट घेऊन आपला राजीनामा सुपूर्द केला. दरम्यान, सुनेत्रा पवार आपल्या दिल्ली दौऱ्यात भाजप पक्षश्रेष्ठींचीही भेट घेण्याची शक्यता आहे. त्यांच्या रिक्त जागी राज्यातून छगन भुजबळ यांच्या नावाची चर्चा आहे.सुनेत्रा पवार यांची १८ जून २०२४ रोजी राज्यसभेच्या सदस्यपदी बिनविरोध निवड झाली होती. तेव्हापासून त्या दिल्लीच्या राजकारणात सक्रिय झाल्या होत्या. परंतू अजित पवारांचे गत २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झाल्याने त्यांना राज्यात परतावे लागले. त्या सध्या सत्ताधारी राष्ट्रवादीच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून राज्यात कार्यरत आहेत. नियमानुसार, कोणत्याही व्यक्तीला एकाचवेळी दोन संसदीय सभागृहांचे सदस्यपद भूषवता येत नाही. त्यामुळे बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत विजय झाल्याने त्यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागला.सुनेत्रा पवार यांच्या या राजीनाम्यामुळे त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेचा मार्ग अधिक स्पष्ट होणार आहे. आता सुनेत्रा पवार यांच्या रिक्त जागेवर कुणाची नियुक्ती होणार? याची चर्चाही राजकारणात सुरू झाली आहे.आपल्या दिल्ली दौऱ्यात सुनेत्रा पवार भाजपच्या काही ज्येष्ठ शिर्ष नेत्यांचीही भेट घेणार अशी चर्चा आहे.या संभाव्य भेटींमध्ये राज्यातील राजकीय घडामोडी, महायुती सरकारमधील समन्वय, आगामी निवडणुकांची तयारी आणि धोरणात्मक मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली दौऱ्याकडे राज्यातील सर्वच पक्षांचे लक्ष लागले आहे. त्यांच्या राजीनाम्याच्या निर्णयामुळे राज्यसभेतील जागेवरही परिणाम होणार आहे. विशेष म्हणजे त्यांचे पुत्र पार्थ पवार यांची या पुर्वीच राज्यसभेवर निवड झाली आहे. विधानसभेत त्यांच्या सक्रिय सहभागामुळे राज्यातील सत्तासमीकरणांवरही परिणाम होऊ शकतो. या दौऱ्यानंतर त्यांच्या पुढील



राजकीय हालचाली काय असतील, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

**छगन भुजबळ यांच्या नावाची चर्चा तर प्रफुल पटेलांचं काय**

सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्याने रिक्त झालेल्या जागेवर कुणाची वर्णी लागणार, याबाबत राज्यात जोरदार चर्चा सुरू आहे. यामध्ये तीन प्रमुख नावांची चर्चा असून, त्यापैकी ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचे नाव आघाडीवर आहे. भुजबळ सध्या राज्यात फडणवीस सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री असून, राज्यसभेची उमेदवारी देऊन त्यांना राष्ट्रवादीच्या कोट्यातील केंद्रात मंत्रिपद दिले जाणार असल्याचे बोलले जात आहे. दुसरे महत्त्वाचे नाव जय पवार यांचे आहे. सुरुवातीला त्यांना विधान परिषदेवर पाठविण्यात येणार होते. परंतू पक्षाने झिशान लसिद्दिकी यांच्या नावाची घोषणा केली. त्यामुळे जय पवार यांना राज्यसभेवर पाठवले जाणार का, जर तसे झाले तर पार्थ पवार आणि जर जय पवार एकाच सभागृहात असतील. तिसरे नाव म्हणजे नितीनकाका पाटील. लोकसभा निवडणूकी दरम्यान सातारा लोकसभा मतदारसंघात वाई येथील एका प्रचारसभेत त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नितीनकाका पाटील यांना राज्यसभेवर पाठवण्याचे जाहीर आश्वासन दिले होते. आता अजित पवार यांच्या पाश्चात पक्षाकडून हा शब्द पाळला जातो का, छगन भुजबळ, जय पवार की नितिनकाका पाटील यांची वर्णी केंद्रीय मंत्री पदी लागणार का याकडेही राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागून आहे.

# सुनील भाऊ पवार वडार भूषण पुरस्काराने सन्मानित



लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील वडार समाज महाराष्ट्र मजूर शिल्प प्रतिष्ठान यांच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आले. २०११ ला शिल्पाचे अनावरण झाल्यापासून गेल्या १५ वर्षापासून कामगार दिनाला समाजाचे तोरण बांधून प्रतिष्ठान च्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, कला, साहित्य, राजकीय विविध क्षेत्रातील समाज बांधवाचे शिल्पकार गौरव, गुणगौरव,सत्कार मूर्ती उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सत्कार केला जातो यंदाही वैष्णवी जाधव,प्रतिक्षा पवार, भिमा पवार, मच्छिंद्र चव्हाण, रामू लष्करे, सचिन भोसले, राजू चव्हाण (गुजरात)श्री सुनिल भाऊ पवार धाराशिव व श्री तुकाराम चव्हाण लातूर व राजेंद्र धोत्रे सासवड पुणे व श्री ज्योती चौगुले सोलापूर व श्री लक्ष्मण ईटकर तुळजापूर व श्री अमर पवार कोल्हापूर यांचा सन्मान चिन्ह व सोलापूर कापडी गुलदस्ता देऊन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक टि. एस. चव्हाण तसेच प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पश्चिम महाराष्ट्र विभागाचे मुख्य अभियंता. श्री. कालिदास भांडेकर, भारतीय सैनिक कर्नल रूषीकेश धोत्रे उपस्थित होते. वडार मजूर दाम्पत्य शिल्पास विधानपरिषद आमदार अमित गोरखे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवी लांडगे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला,क्रिडा, साहित्य व सांस्कृतिक सभापती कैलास कुटे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थानिक नगरसेवक कुशाग्र कदम,नगरसेविका वैशाली काळभोर, मा. प्रकाश बाबर, सौ ऐश्वर्या अमित बाबर अश्विनी वाबळे राहुल पाटील, विशाल काळभोर,दत्ता देवतरसे उपस्थित होते. सर्वांनी मिळून दीपप्रज्वलन, व महाराष्ट्र चे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून स्वर्गीय गायिका आशा भोसले, बाबा आढावा या सर्वांना श्रध्दांजली अर्पण केले तदनंतर महाराष्ट्र गीत म्हणून कार्यक्रम आरंभ केले प्रसत्विक भाषण संस्थापक अध्यक्ष शामराव विटकर यांनी केले त्यानंतर महापौर रवी लांडगे यांनी आपल्या भाषणात वडार समाजाचे इतिहास व पिंपरी चिंचवड शहर घडवण्यासाठी दिलेले योगदान याचा उल्लेख केला आजचा दिवस दुग्धशर्करा आहे कारण बौध्द पोर्णिमा, महाराष्ट्र दिन, कामगार दिन, मराठी भाषिक दिन हा एकाच दिवशी आले असे सांगितले त्यांनी सगळ्याचे आभार मानले. त्यानंतर भाऊसाहेब भोईर यांनी वडार समाजाशी माझे नाते आहे मी पण यांच्यातील एक आहे कारण तळेगाव माजी नगराध्यक्ष सुरेश धोत्रे हे माझे गुरू बंधू आहेत त्यामुळे समाजाशी माझे नाते आहे वडार मजूर शिल्प प्रतिष्ठान दरवर्षी चांगले उपक्रम घेते त्यांनी खूप कौतुक केले. त्यानंतर उपमहापौर यांनी दाम्पत्य शिल्प छान आणि पिंपरी चिंचवड जडणघडणीचा वास्तविकता दर्शवणारी प्रतिमा असल्याचे सांगितले. सभापती कैलास कुटे यांनी वडार मजूर दाम्पत्य शिल्पाच्या कार्यक्रम साठी शुभेच्छा दिल्या तसेच कला, क्रीडा, साहित्य आणि सांस्कृतिक विभाग त्यांच्या कडे असल्याने त्यांच्या पदाचा खरा सन्मान या कार्यक्रमासाठी उपयोगी ठरल्याचे समाधान वाटले येणाऱ्या काळात अजून काही सांस्कृतिक कार्यक्रम संस्थेचे वतीने राबविले तर नक्कीच पाहिजे ते मदत देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. समाजातील भारतीय सैनिक कर्नल धोत्रे यांनी कर्नल पदावर कसे गेले व त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी केलेल्या कार्य संगितले समाजातील तरूणांनी सैन्य मध्ये जावे असे मार्गदर्शन केले. एकता परिषद चे अध्यक्ष भरत विटकर यांनी समाजाचे इतिहास समाजातील लोकांनी नेमके काय करावे याच्या वर व्याखान दिले. यावेळी मंत्रालय टिम सुधीर पवार, नितीन आण्णा धोत्रे, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप पवार, नवी मुंबई सागर चौगुले, संदीप शिंदे, सोलापूर रवी शिंदे,विष्णू चौगुले,शिर्डी एक्सप्रेस चे संपादक रमेश जेठे, पुणे चे मा उपमहापौर मुकारी आलगुडे,संदीप पवार, हरिष बंडीवडार, अशोक पवार, सदाशिव जाधव,मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार सचिव लखन पाटकर यांनी केले तर सन्मान पुरष्कार सौजय कै. विठ्ठल मारुती विटकर कै. सावित्रीबाई आपल्या आई वडिलांच्या स्मरणार्थ

सामाज्याला पेरणा मिळाला

चिन्हे सौजन्य अनिल विटकर तर सूत्रसंचालन अर्मताश्वरी यांनी केले.

अन्नदान व्यवथा सौजन्य. मा. पिंटू जाधव यांनी केले

वडार समाज महाराष्ट्र मजूर शिल्प प्रतिष्ठान चिंचवड पुणे

संस्थापक अध्यक्ष, शामराव विटकर

संयोजन :– अध्यक्ष नागेश पवार, सहसचिव अमर दौंडकर, सागर ओरसे,पिंटू जाधव, अनंत नलावडे, राजु कुसाळकर, सुनिल शेलार,दिलिप मुरकुटे सचिन चौगुले अन्य कार्यकर्त होते

# मैं ॲक्टर नहीं हू

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्री.कुणाल साळुंके, चित्रपट समीक्षक/ फिल्म क्रिटीक**

काही चित्रपट हे त्यांच्या साधेपणामुळे प्रेक्षकांना आवडतात.
फक्त मारधाड आणि कर्णकर्कश संगीता मुळे आणि न समजणाऱ्या कथानकामुळे ते प्रेक्षकांना आवडतीलच असे नाही.

नवाजुद्दीन सिद्दीकी अभिनित 'मैं एक्टर नहीं हूं' हा नुकताच प्रदर्शित झालेला हिंदी चित्रपट त्याच्या साध्या मांडणी मुळे रसिकांना आवडेल असे वाटते.
अश्या चित्रपटांचे प्रेक्षक हे मोजकेच असतात आणि निवडक थिएटर्स मध्ये रिलीज होतात.
दिग्दर्शक व निर्माते आदित्य कृपलानी यांनी कथेची मांडणी पडद्यावर संथगतीने केलेली दिसते.
मौनी रॉय ( चित्रांगना सतरुपा) ह्या मुंबई मधील मेहनती आणि तितकीच फ्रस्ट्रेट झालेली स्ट्रगलिंग अभिनेती असते.आपल्या कलेशी प्रामाणिक आणि
कलेला सर्वस्व समजणारी अशी ही अभिनेत्री असते.
अदनान बेग (नवाजुद्दीन सिद्दिकी) पन्नाशी पूर्ण केलेला एक रिटायर्ड बँकर जो जर्मनीतील फ्रँकफर्ट शहरात राहत असतो.तो स्वतःच्या डिप्रेशन आणि एकटेपणाशी झुंज देत असतो. एका अभिनय ऑडिशन दरम्यान या दोघांची ओळख होते.नंतर व्हिडिओ कॉल वर ते बोलत असतात. नवाजुद्दीन तिच्या अभिनयावर प्रभावित होतो आणि अभिनयातील गुरु समजायला लागतो.
त्यांची ओळख नंतर मैत्री आणि घट्ट भावनिक संबंधातून प्रेमाकडे वळण घेते. शेवटी दोघेही एकमेकांमध्ये आत्मशोध घेतात.
आदित्य कृपलानी ची ही एक एक्स्पेरिमेन्टल पेशकश पडद्यावर बघायला भारी वाटते.
मुंबईची धावपळीची लाईफस्टाईल आणि फ्रॅंकफर्ट ची शांत अन् निवांत जीवनशैली चे तुलनात्मक दर्शन प्रेक्षकांना बघायला मिळते.
संथ संगीत आणि सिनेमा फोटोग्राफी उत्कृष्ट आहे. चित्रपटातला बराचसा भाग व्हिडिओकॉलिंग वर चित्रित झाला आहे. एडिटिंग अजून चांगले झाले असते.
चित्रपटाचा क्लायमॅक्स आपल्याला विचार करायला भाग पडतो.

नवाजुद्दीन सिद्दीकी अभिनयातील राजा माणूस तर आहेच ,त्याने पुन्हा एकदा खूप प्रतिक्षेनंतर मनाला भिडणारा अभिनय केला आहे.पण क्लिष्ट संवाद समजण्यास मुश्किल वाटतात.चित्रांगना सतरूपा ने अतिशय नैसर्गिक अभिनय केला आहे. इतर कलाकाराचे कौतुक. हा चित्रपट जगभरातील अनेक चित्रपट महोत्सवांमध्ये कौतुकास पात्र ठरला आहे.थोडक्यात सांगायचे तर हा एक भावनिक आणि अंतर्मुख करणारा चित्रपट आहे, जो फक्त एक्सपेरिमेंटल चित्रपट बघणाऱ्या सिनेप्रेमींनाच आवडेल.
माझा मते चित्रपटाला ३ स्टार




## यशाची परंपरा कायम! माध्यमिक विद्यालय हरडफचा दहावीचा निकाल ९० टक्के

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

श्री बालाजी वैयक्तिक शिक्षण प्रसारक मंडळ, हदगाव द्वारा संचलित माध्यमिक विद्यालय, हरडफ येथील विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या शालांत (SSC) परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९०% लागला असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचा झेंडा फडकवला आहे.




*विद्यालयातील गुणवंत विद्यार्थी:*
विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह यश मिळवले आहे. त्यातील प्रथम चार गुणवंत विद्यार्थी खालीलप्रमाणे आहेत:
१. *कु. शिवकन्या दत्ता मोरे* - (प्रथम क्रमांक - ६९%)
२. *कु. संचिता गजानन शिंदे* - (द्वितीय क्रमांक - ६८.८०%)
३. *कु. संध्या राजू जाधव* - (तृतीय क्रमांक - ६७%)
४. *कु. वेदिका भागोराव सूर्यवंशी* - (६४.८०%)

*प्रवेश प्रक्रिया सुरू:*
विद्यालयाच्या या सातत्यपूर्ण यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे. या यशासोबतच विद्यालयात *इयत्ता ५ वी ते १० वी* साठी नवीन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असल्याची माहिती शाळा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

*सर्वस्तरातून कौतुक:*
या घवघवीत यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थाचालक, पालक आणि ग्रामस्थांनी त्यांचे विशेष कौतुक केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## महेश कोळी यांना दैनिक लोकनेताच्या वतीने उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रदान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । फिरोज जागीरदार**

मौजे बेलकुंड ता. औसा येथील एका सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेतलेले सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते
पत्रकारितेमध्ये महेश निवृती कोळी यांनी दैनिक लोकनेताचे औसा ता. प्रतिनिधी झाल्यानंतर अल्पावधीतच निर्भिड पणे अन्याय, अत्याचारा विरोधात लेखन करून सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून दिला आहे. यांच्या कार्याची दखल घेऊन दैनिक लोकनेताने महेश निवृती कोळी यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.
दरवर्षी प्रमाणे याही वर्षी लोकनेताच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त परळी वैजनाथ येथे पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमात दैनिक लोकनेताच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला दि १० में



२०२६ रोजी हॉटेल भागवत पॅलेस, छत्रपती शिवाजी महाराज चौक परळी वैजनाथ जि. बीड येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने (जगप्रसिद्ध नेत्ररोगतज्ञ), ज्ञानेश्वर मुंढे ( मुख्य संपादक दैनिक लोकनेता बीड),फिरोज जागीरदार (विभागीय संपादक लोकनेता)(सौ. मेघना झुझम (अभिनेत्री - सावित्रीबाई फुले एकपात्री नाट्यप्रयोग फेम पुणे), डॉ. मयंक गांधी (संस्थापक ऋतढ), रावसाहेब घुगे (संस्थापक बाप आयटी कंपनी) इत्यादी मान्यवरांच्या हस्ते इतर व्यक्ती बरोबर समाजभूषण महेश निवृती कोळी यांनाही उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

## मुखेड वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याच्या कारभाराची चौकशी करा:निलंबनाची मागणी

# माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे शिष्टमंडळ उपवनसंरक्षकांना देणार निवेदन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड वनपरिक्षेत्रातील कथित भ्रष्टाचार, अवैध वृक्षतोड आणि तक्रारदारांना धमकावण्याच्या गंभीर प्रकारांची सखोल चौकशी करून वनपरिक्षेत्र अधिकारी उल्हास चव्हाण यांना तात्काळ निलंबित करावे, या प्रमुख मागणीसाठी काँग्रेसचे शिष्टमंडळ लवकरच नांदेड येथील उपवनसंरक्षकांची भेट घेऊन निवेदन सादर करणार आहे. शहर काँग्रेस अध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांनी ही माहिती दिली.

**माजी आमदारांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ**

काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या नेतृत्वाखाली हे शिष्टमंडळ जाणार आहे. मुखेड वनविभागातील विविध गंभीर प्रकारांकडे वनखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून तातडीने कारवाईची मागणी केली जाणार आहे.

**अवैध वृक्षतोडीचा आरोप**

मुखेडसारख्या दुर्गम भागात काही लाकूड व्यापारी व स्थानिक घटकांना हाताशी धरून मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड सुरू असल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संरक्षित क्षेत्रातील शेकडो मौल्यवान झाडांची कत्तल करून मोठ्या प्रमाणावर लाकडाची अवैध विक्री होत असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे. यामुळे पर्यावरणाची अपरिमित हानी होत असून वनसंपदा धोक्यात आली आहे.

**तक्रारदार व पत्रकारांना धमक्या**

या प्रकरणाविरोधात आवाज उठवणारे तक्रारदार, स्थानिक पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांना धमकावले जात असल्याचा धक्कादायक आरोपही काँग्रेसने केला आहे. सत्य समोर आणणाऱ्यांचेच तोंड बंद करण्याचा प्रयत्न होत आहे, असे नारनाळीकर म्हणाले.

**२८ एप्रिलच्या निवेदनानंतरही कारवाई नाही**

दरम्यान, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी या संदर्भात वनविभागाला लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र, महिना उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. संबंधित अधिकाऱ्याला राजकीय वरदहस्त असल्यामुळेच कारवाई टाळली जात असल्याचा थेट आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

**अतिक्रमणाला अभय?**

वनपरिक्षेत्रातील सरकारी जमिनीवर होणाऱ्या अतिक्रमणाला अधिकाऱ्यांकडून अभय दिले जात असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. नियम धाब्यावर बसवून वनजमिनी लाटल्या जात आहेत, असा आरोप आहे.

**काँग्रेसच्या प्रमुख मागण्या**

१. वनपरिक्षेत्र अधिकारी उल्हास चव्हाण यांचे तात्काळ निलंबन करावे.
२. संपूर्ण प्रकरणाची खातेनिहाय सखोल चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करावी.
३. अवैध वृक्षतोड व लाकूड तस्करीची स्वतंत्र पथकामार्फत चौकशी व्हावी.
४. मुखेड वनविभागात पारदर्शक, कर्तव्यदक्ष व जनहिताची भूमिका घेणारा सक्षम अधिकारी नियुक्त करावा.

वनसंपदेचे रक्षण करणे ही वनविभागाची जबाबदारी आहे. मात्र, इथे रक्षकच भक्षक बनल्याचे चित्र आहे. वरिष्ठांनी तातडीने दखल न घेतल्यास काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा माजी आमदार बेटमोगरेकर यांनी दिला आहे.

## कारला गावचे सुपुत्र खंडु हनमंत निकम दहावीत ९५% गुण घेत उत्तीर्ण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जीवन जाधव । औसा**

औसा तालुक्यातील कारला येथील खंडु हनमंत निकम विद्यार्थ्यांनी दहावी बोर्ड परीक्षेत ९५% गुण घेत घवघवित यश संपादन केले असुन ,कारला येथील विद्यार्थी खंडु हनमंत निकम हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील असुन खंडु यांना लहानपणापासुनच आभ्यासाची आवड व शिक्षणात हुशार असल्यांने खंडु निकम यांनी आपल शिक्षण घेत असताना सुरुवातीला एल के.जी ते ४ थी कांतिका मोरे बालसंस्कार केंद्रात घेतले त्यानंतर पाचवी ते सातवी महाराष्ट्र विद्यालय किल्लारी व आठवी ते दहावी जयभारत विद्यालय दापका निलंगा येथे दहावी बोर्डची परीक्षा दीली होती त्यात लागलेल्या निकालात ९५%गुण घेत खंडु निकम हे उत्तिर्ण झाल्याने स्वग्रही सत्कार संपन्न झाला यावेळी खंडु ची आई ,काकी ,आजी व महिलांनी औक्षण करुन पेढे भरवत खंडु निकम यांच्या



यशाबद्धल कौतुक केले ,
यावेळी श्री संत शिरोमनी मारुती महाराज साखर कारखाना संचालक विलास काळे ,औसा पंचायत समिती मा.उपसभापती विश्वास काळे ,सरपंच सुरेश पवार ,
ज्ञानोबा(माउली) काळे ,
ज्ञानेश्वर काळे ,नारायण काळे अभंग निकम, महेश जाधव ज्ञानेश्वर जाधव, सचिन किलजे, व्यंकट काळे,हंसराज जाधव ,सतीश पवार, काशिनाथ जाधव ,अमोल पारुडकर ,मारुती वाघे ,बलभीम कुलकर्णी ,बालाजी निकम नागनाथ काळे ,पंडीत निकम ,अनिता जाधव ,मंकावती जाधव प्रमिला जाधव रोहिणी जाधव, शामल काळे ,निर्मला काळे, गोदावरी निकम, सुप्रिया निकम, अर्चना निकम सह कारला ग्रामस्थ व निकम परीवारातील ग्रामस्थांनी शुभेच्छा देत पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दील्या ,,

## सर्वसामान्यांवरच कारवाई, ओव्हरलोड टिपरांकडे दुर्लक्ष का?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । वंकलवार प्रभू**

रेती वाहतुकीत नियमांचे खुलेआम उल्लंघन होत असताना ठढज विभागाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.
सर्वसामान्य वाहनधारकांकडून दंड वसूल करण्यात तत्पर असलेले अधिकारी ओव्हरलोड रेती वाहतूक करणाऱ्या टिपरांवर कारवाई करण्यास का टाळाटाळ करत आहेत? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.
रोज रस्त्यावरून धोकादायक पद्धतीने धावणारे ओव्हरलोड टिपर प्रशासनाला दिसत नाहीत का?
वाहतुकीचे नियम फक्त सामान्य जनतेसाठीच आहेत का?
अनेक वेळा तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.
ओव्हरलोड वाहनांमुळे रस्त्यांचे मोठे नुकसान होत असून अपघातांची शक्यता वाढत आहे.
तरीही संबंधित विभागाचे मौन संशय निर्माण



करणारे असल्याची चर्चा परिसरात रंगत आहे.
जनतेची मागणी आहे की,
ओव्हरलोड टिपरांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करावी
अवैध रेती वाहतुकीची चौकशी करावी
संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी
अन्यथा आंदोलनाचा इशारा भ्रष्टाचार निर्मूलन ता अध्यक्ष व दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ देगलूर ता अध्यक्ष . लोकनेता ता .प्रतिनिधी तसेच त्रिनेत्र चॅनल मुख्य संपादक वंकलवार प्रभू यांनी दिला आहे.

# किशनदादा गायकवाड यांना दैनिक लोकनेता च्या वतीने उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रदान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । प्रतिनिधी**

मौजे कुदळा ता. उमरी येथील एका सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेतलेले सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते समाजभूषण किशन दादा सटवाजी गायकवाड यांनी दैनिक लोकनेताचे उमरी ता. प्रतिनिधी झाल्यानंतर अल्पावधीतच निर्भिड पणे अन्याय, अत्याचारा विरोधात लेखन करून सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून दिला आहे. यांच्या कार्याची दखल घेऊन दैनिक लोकनेताने किशन दादा सटवाजी गायकवाड यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.



दरवर्षी प्रमाणे याही वर्षी लोकनेताच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त परळी वैजनाथ येथे पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमात दैनिक लोकनेताच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला दि १० में २०२६ रोजी हॉटेल भागवत पॅलेस, छत्रपती शिवाजी महाराज चौक परळी वैजनाथ जि. बीड येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने (जगप्रसिद्ध नेत्ररोगतज्ञ), ज्ञानेश्वर मुंढे ( मुख्य संपादक दैनिक लोकनेता बीड), सौ. मेघना झुझम (अभिनेत्री – सावित्रीबाई फुले एकपात्री नाट्यप्रयोग फेम पुणे), डॉ. मयंक गांधी (संस्थापक GVT), रावसाहेब घुगे (संस्थापक बाप आयटी कंपनी) इत्यादी मान्यवरांच्या हस्ते इतर व्यक्ती बरोबर समाजभूषण किशनदादा गायकवाड कुदळेकर यांनाही उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.किशनदादा गायकवाड यांना लहानपणा पासूनच अन्याय, अत्याचार व भ्रष्टाचारा विरोधात लढण्याचा छंद आहे. त्यांच्या पुढे कितीही अपयश आले तरी तो माघार घेत नाहीत.

सध्याच्या भ्रष्टाचारी काळात शेतकरी, कष्टकरी, कामगार, विद्यार्थी, कंत्राटी कर्मचारी, अन्याय ग्रस्त दलितांना व पिडीत महिला पुरूषांना न्याय मिळत नाही. काही पत्रकार बांधव चिरीमिरी मिळत नाही म्हणून सत्ताधारी लोकप्रतिनिधी व प्रशासकिय अधिकारी यांच्या विरोधात लेखणी उचलत नाहीत. किशनदादा गायकवाड यांना याची चिड येत होती. काही पत्रकार बांधवांना बातमी दिली तर लाचार पत्रकार बंधु जाहिराती मिळत नाहीत म्हणून अन्याय, अत्याचाराच्या विरोधात बातमी प्रसिद्ध करीत नव्हते. म्हणून किशनदादा गायकवाड यांनी स्वतः २०२४ साली दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर अकॅडमी नाशिक येथे पत्रकारीतेचा कोर्स पूर्ण करून पत्रकार पदवी प्राप्त करून दैनिक लोकनेताचे उमरी तालुका प्रतिनिधी म्हणून काम सुरू केले आहे. कशाचीही अपेक्षा न ठेवता त्यांच्या डोळ्यासमोर जी सत्य घटना घडली आहे. मग तो कोणीही असो, त्यांच्या विरोधात लेखणीद्वारे आवाज उठवुन पिडित लोकांना न्याय मिळवून दिला आहे. पोलिस अधिकारी, महसूल अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या विरोधात बातम्या प्रसिध्द करून, निराधार, घरकुल योजनेचे लाभधारक, व शेतकरी यांना न्याय मिळवून दिला आहे. यांच्या धाडसी कार्याची दखल घेऊन दैनिक लोकनेता ने गायकवाड यांना दि १० मे २०२६ रोजी उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. या बाबत भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य तथा सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते, निर्भिड पत्रकार, समाजभूषण किशनदादा गायकवाड यांचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार राजेशजी पवार, सौ. पुनमताई राजेश पवार, शेतकरी नेते उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, भाजपा उमरी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील सावंत, डॉ विक्रम देशमुख, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, नगरसेविका सायली कुलकर्णी, गंगाधर पाटील पुयड, अविनाश पाटील कदम, बापूसाहेब पाटील कौडगावकर व नांदेड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते, मित्र मंडळी, व पत्रकार बांधवांनी पत्रकार किशनदादा गायकवाड कुदळेकर यांचे अभिनंदन केले असून पुढील भावी काळासाठी हार्दिक शुभेच्छा दिले आहेत.

---

## वाड्यात विविध क्षेत्रातील गुणवंत व्यक्तीमत्वांचा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान

# रंगतदार प्रकाशन व मी कुणबी बोलतोय संस्थेचा पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पालघर । श्री तुषार भोईर**

रंगतदार प्रकाशन व मी कुणबी बोलतोय साहित्य समूह यांच्या संयुक्त विद्यमानाने आज रविवार (ता.१०) रोजी वाडा तालुक्यात कुडूस येथे एका दिमाखदार सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा-या गुणवंत व्यक्तिमत्त्वांचा मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.या कार्यक्रम प्रसंगी योगेश गोतारणे लिखित गांव शहरांचा मागोवा या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक रंगतदार साहित्य कला मंडलाचे अध्यक्ष विजय जोगमार्गे यांनी केले.




या पुरस्कार सोहळ्यात बाळशास्त्री जांभेकर पत्रकार पुरस्कार अनंता दुबेले, जीवनगौरव पुरस्कार डॉ.शरद भोईर, विद्या भूषण पुरस्कार संदेश पाटील, कुणबी समाज भूषण पुरस्कार संतोष वेखंडे, कुणबी समाज रत्न पुरस्कार नरेश आकरे व कलाभूषण पुरस्कार विलास जाधव यांना देऊन सन्मानित करण्यात आले. लेखक,कवी व साहित्यिक इंद्रजित पाटील यांनी येथे जन्मली माणुसकी ही कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रम प्रसंगी कुणबी सेना प्रमुख विश्वनाथ पाटील, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सल्लागार ज्योतीताई ठाकरे, मराठी साहित्य परिषदेचे पालघर जिल्हाध्यक्ष प्रविण दवणे,इतिहास संशोधिका प्रेरणा राऊत, दिलीप कोरे, संभाजी मोरे,लक्ष्मण पाटील, डॉ.प्रमोद पाटील, डॉ.गिरीश चौधरी, मुद्दसर पटेल, दिलीप पाटील, रंजन पाटील, राजेंद्र वेखंडे आदी मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप दुपारे यांनी केले.तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले

---

# चोंडी गावच्या रितेश अमरनाथ मुंडे याचे दहावी परीक्षेत घवघवीत यश–८६.२०% गुणांनी उत्तीर्ण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**धारूर । प्रदीप मुंडे**

चोंडी गावचा रहिवासी आणि महाराष्ट्र विद्यालय, मोहा चा विद्यार्थी रितेश अमरनाथ मुंडे याने दहावीच्या परीक्षेत ८६.२० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आपल्या मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर रितेशने हे यश प्राप्त केले असून चोंडी गावासह शाळेचेही नाव उज्ज्वल केले आहे.

रितेशच्या या यशाबद्दल त्याचे आजोबा रावसाहेब मुंडे (माजी सैनिक) व वडील अमरनाथ मुंडे (माजी सैनिक) यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच शाळेतील शिक्षक कुसुम कर सर, तारे सर, बनसोडे सर, मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांनी रितेशचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



रितेशच्या या यशामुळे चोंडी गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून इतर विद्यार्थ्यांसाठी तो प्रेरणादायी ठरत आह

---

# किनवट येथे मुस्लिम समाजाचा सामुहिक विवाह सोहळा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

आजच्या प्रचंड महागाईच्या काळात लग्नकार्यावरील होणारा अवाढव्य खर्च टाळून, मुस्लिम समाजातील विवाह सोपे आणि सुटसुटीत व्हावेत या उद्देशाने 'तन्जीम रहेनुमा–ए–कारवाँ' या संस्थेच्या वतीने आयोजित १३ वाईज्तेमाई शादीयॉ अत्यंत उत्साहात वातावरणात पार पडला. ८ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता गोकुंदा रोडवरील एन. के. गार्डन येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये २३ जोडपी निकाहबद्ध झाली.

तन्जीम रहेनुमा–ए–कारवाँ ही संस्था मागील १३ वर्षांपासून सातत्याने सामूहिक विवाहाचे आयोजन करत आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत या संस्थेने आतापर्यंत तब्बल ३५९ जोडप्यांचे विवाह यशस्वीरीत्या संपन्न घडवून आणले आहेत. गोरगरीब कुटुंबांना आधार



देण्याचे आणि समाजात एकतेचा संदेश देण्याचे कार्य ही संस्था अविरतपणे करत आहे. निकाह विधीः मौलाना काझी शब्बीर यांनी 'खूदबे–ए–निकाह' वाचून विवाह विधी शास्त्रोक्त पद्धतीने पार पाडले. सुप्रसिद्ध विचारवंत मुफ्ती तन्वीर यांनी

श्रीमती उपस्थित नवविवाहित जोडप्यांना आणि जनसमुदायाला मार्गदर्शन केले. सूत्रसंचालनः मुफ्ती साजीद व हाफिज शरफोद्दीन यांनी सामूहिक दुआ (प्रार्थना) केली, तर संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन मौलाना सऑदत यांनी केले. यावेळी आ. भीमराव केराम, नगराध्यक्षा सुजाताताई एड्रलवार, शिवसेना जिल्हाप्रमुख ज्योतिबादादा खराटे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या बेबीताई प्रदिप नाईक, ईसा खान, निसार खान, उपनगराध्यक्ष हसन खान पठाण, अरूण आळणे, के. मुर्ती, पवार, गिरीश नेम्मानिवार, शेख मुक्रम भाई व श्री बालाजी बामणे आदींची उपस्थिती होती.

---

# धनगरवाडीत विकास कामांचे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान समितीकडून पाहणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

पाथर्डी तालुक्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात २० गावांनी सहभाग नोंदवला आहे. या अभियानात सहभागी झालेल्या धनगरवाडी गावात पाहणी करण्यासाठी आलेल्या समिती सदस्यांचे गावात ठिकठिकाणी रांगोळी काढून स्वागत करण्यात आले.

पाथर्डी तालुक्यातील अभियानातील २० गावांची मूल्यांकन करण्यासाठी बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई तालुक्यातील समिती दाखल झालेले असून समितीने दिनांक ६ वार बुधवार रोजी सकाळी साडेआठ वाजता धनगरवाडीत पाहणी करणेकामी आली असता गावाने त्यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले. समितीत समिती प्रमुख गटविकास अधिकारी श्री कैलास बलवंत विस्तार अधिकारी अशोक सावध समिती सदस्य राहुल दुबे अक्षय कांबळे अक्षय गायकवाड यांचा समावेश आहे.



प्रथमता धनगरवाडी गावात समिती दाखल झाल्यानंतर गावाने समितीचे मोठया उत्सवाने स्वागत केले संपूर्ण स्वागत कार्यक्रम झाल्यानंतर समितीने अभियान कालावधीतील आठ घटकावर केलेल्या सर्व कामांची पाहणी केली असता समितीने गावाने केलेल्या कामा बाबत समाधान व्यक्त केले व कामा संदर्भात असलेल्या संपूर्ण अभिलेखे पाहून समिती प्रमुखाने ग्रामपंचायत अधिकारी रोंढे गोपीचंद यांचे विशेष कौतुक केले व समितीने गावाचे आभार मानून सांगितले की जर गावात एकजूट असेल व गावात शासकीय कर्मचारी चांगले असेल तर गावाचा कायापाळट झाल्याशिवाय राहत नाही, जे की धनगरवाडी गावाने करून दाखविलेले दिसून येत आहे, तसेच समितीने गावासाठी अभियानात सक्रिय काम करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचारी राजू राठोड, मच्छिन्द्र चितळे, ईश्वर गाढे यांचा सन्मान केला. गावात संपूर्ण बाबींची पाहणी केल्यानंतर समितीने समाधान व्यक्त करून गेले.

कार्यक्रमास गावचे सरपंच हिराबाई चितळे उपसरपंच किशोर राठोड अशोकराव गाढे व सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते व ग्रामस्थ रंगनाथ महाराज नरहरी महाराज सखाराम पवार गंगाधर गाढे प्रल्हाद पितळे हनुमान जिवडे व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## श्री शिवाजी विद्यालयाचा ९६ टक्के निकाल

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । शिवाजी निरमनाळे**

येथील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९६ टक्के लागला आहे.विद्यालयातून सर्वप्रथम चि.बोराडे युवराज संभाजी हा ९८.६०% , सर्व द्वितीय क्रमांक कु. तोडकर भक्ती सुभाष ९८% सर्व तृतीय क्रमांक कु. वाघमारे अनुजा सुग्रीव हिने ९७.८०% गुणानुक्रमे चौथा क्रमांक स्वामी श्रुती नागनाथ ९६% तसेच पाचवा क्रमांक कु.गोरे आदिती नेताजी ९५.८०% गुण घेतली आहे.श्री शिवाजी मा.व उच्च मा. विद्यालयात ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे विद्यार्थी १८ तर विशेष प्राविण्य ८३ विद्यार्थी , प्रथम श्रेणी प्राप्त ९३ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी ४४ विद्यार्थी, तृतीय श्रेणी १४ विद्यार्थी आहेत.यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र पाटील , व्यवस्थापकीय संचालक प्रा. शेषरावजी मोहिते पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.उदय मोहिते पाटील , संस्थेचे सचिव अजय भैय्या जाधव तसेच उपसचिव राजश्रीताई पाटील , कोषाध्यक्ष बालाजी पोळ, उपकोषाध्यक्ष डॉ. वैशालीताई मोहिते पाटील .संचालक वसंत पाटील ,मेघाताई जाधव ,संजयजी हलगरकर, श्रुती पाटील तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्सना पाटील, उपमुख्याध्यापक बालाजी गुरमे,, पर्यवेक्षक सविता झिरमिरे, पर्यवेक्षक अशोक तोगरे ,वसंत भोपे आदींनी अभिनंदन केले सदरील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेच्या वतीने प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास कै.रामचंद्र गुंडाजी जाधव यांच्या स्मरणार्थ पाच हजार शंभर रुपये , तसेच द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास कै.रामराव माधवराव पाटील यांच्या स्मरणार्थ तीन हजार शंभर



रुपये , तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यास कै.रावसाहेब माधवराव पाटील यांच्या स्मरणार्थ २१०० रुपये व गुणानुक्रमे चौथा आणि पाचवा क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यास एकहजार रोख रुपये व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाल, श्रीफळ ,फेटा बांधून स्मृतीचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री शेषराव मोहिते पाटील हे उपस्थित होते तर यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे कोषाध्यक्ष श्री बालाजी पौळ यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले . याप्रसंगी व्यासपीठावर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्सला पाटील ,उप मुख्याध्यापक बालाजी गुरमे, पर्यवेक्षिका सविता झिरमिरे, अशोक तोगरे ,वसंत भोपे , प्रविण घोरपडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ मेघवर्षा वाकडे तर आभार तनुजा शेख यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933